# आनंदाचे प्रसंग

# १०










## चला, शिकू या...

- आवडनिवड सांगणे, विचारणे
- शुभेच्छा देणे
- वाढदिवस सांगणे, विचारणे
- वाढदिवसाचे आमंत्रण करणे
- होकार व नकार देणे

## १ तू फावल्या वेळेत काय काय करतोस / करतेस?



## २ वर्गात खालील कृतींचे हावभाव करून आवड ओळखता येते का पाहू या.

नाचणे
नाटक / सिनेमा बघणे
गाणे
चित्र काढणे
बागकाम करणे
फिरणे
चित्र रंगवणे
कविता करणे
वाचन करणे
गाणी ऐकणे
खेळणे
पत्र लिहिणे
गप्पा मारणे
स्वयंपाक करणे
सायकल चालवणे

## ३ खालील नमुन्याप्रमाणे आपण आपापल्या सहकाऱ्याला विचारू या.

**अ :** तू वेळ मिळाला की काय करतोस?
**ब :** मी मित्रांना घरी बोलावतो आणि त्यांच्याबरोबर पत्ते खेळतो. तू काय करतोस?
**अ :** ऑफिस असतं रोज. वेळ नसतो.

| | | |
|---|---|---|
| तू फावल्या वेळेत काय काय करतोस/करतेस? | वाचन<br>लेखन<br>पोहणे<br>चित्र काढणे<br>फिरणे... | मी फावल्या वेळेत... |
| तुझा छंद कोणता? | | हा माझा छंद आहे. |

## ४ ऐकू या आणि पुढील तक्ता भरू या.

**आपण फावल्या वेळात काय करता?**

★ मी टी.व्ही. बघतो. मला रविवारी वेळ असतो. तेव्हा मी मालिका आणि चित्रपट पाहतो. कधीकधी सकाळी सायकल चालवतो किंवा फुटबॉल खेळतो. संध्याकाळी मी माझ्या मित्रांना भेटतो.

★ अं... मी फावल्या वेळात नवीन पुस्तकं वाचते. ऑफिस ५ ला सुटतं. मग मी रोज संध्याकाळी बाहेर फेरी मारते. फ्रेश वाटतं.

★ मी कराटे शिकतो. आत्ताशी सुरुवात केली आहे शिकायला. पण मज्जा येते. आई मला न्यायला येते. मग आम्ही लिंबू सरबत पितो; मस्त, थंडगार!

★ मी वेगवेगळ्या भाज्या बनवते. मला फार आवडतं वेगवेगळ्या भाज्या बनवायला. सकाळी नि संध्याकाळी मी वेगवेगळी भाजी करते. मी केलेल्या चमचमीत भाज्या फार आवडतात माझ्या मुलांना.

| | काय | कधी / केव्हा |
|---|---|---|
| **व्यक्ती १** | मालिका आणि चित्रपट पाहणे | रविवारी |
| **व्यक्ती २** | | |
| **व्यक्ती ३** | | |
| **व्यक्ती ४** | | |

## ५ आता खालील चिठ्ठ्या वाचून आपल्याला काय आवडतं आणि काय आवडत नाही ते सांगू या.



**मंदार**
मला गप्पा मारायला आवडतं. मी गप्पिष्ट आहे आणि मला पुष्कळ मित्र आहेत. दिवसभर आम्ही वॉट्स ॲपवरच असतो. आम्हाला बोलायला आवडतं.

**अनिता**
मला गाणी ऐकायला आवडतं. मी गाणी डाउनलोड करते आणि मोबाइलवर ऐकते. मला गाडी चालवायलाही आवडतं. माझ्याकडे नॅनो आहे.





**शेखर**
मला पुस्तकं वाचायला आवडतं. माझ्याकडे तीन मोठी कपाटं भरून पुस्तकं आहेत. मला बाथरूममध्ये गायलाही आवडतं, पण मला मोबाइलवर खेळायला आवडत नाही.

**निशिता**
मला सिनेमे बघायला खूप आवडतं. दर शुक्रवारी मी मैत्रिणींबरोबर एक सिनेमा बघते. पण मला नाटक पाहायला आवडत नाही.



**थोडक्यात**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| करणे | → | कर + आयला | → | करायला |
| वाचणे | → | वाच + आयला | → | वाचायला |
| ऐकणे | → | ऐक + आयला | → | ऐकायला |
| बघणे | → | बघ + आयला | → | बघायला |
| गाणे | → | गा + आयला | → | गायला |
| | | **पण** | | |
| येणे | → | ये + आयला | → | यायला |
| देणे | → | दे + आयला | → | द्यायला |
| घेणे | → | घे + आयला | → | घ्यायला |
| पिणे | → | पी + आयला | → | प्यायला |
| लिहिणे | → | लिह + आयला | → | लिहायला |

व्याकरण

चल, आपण फिरायला जाऊ या.

तू सिनेमा बघायला येतोस का ?

आपल्याला निघायला हवं.

अरे, यायला काय हरकत आहे ?

अभ्यास करायला लागतो रे.

अगं, जेवायला बस.

**६ वर्गातल्या मित्र - मैत्रिणींना विचारून कोणाला काय आवडतं ते लिहू या. फक्त दोन मिनिटं आहेत हं ! पाहू या, कोण सर्वात जास्त लिहितं ते.**

मधुराला पुस्तकं वाचायला आवडतं. रोहितला झोपायला आवडतं. ...

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>तुला काय करायला आवडतं ? (गाणे) | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>मला गायला आवडतं. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| खेळणे | मला खेळायला आवडतं. |
| फिरणे | मला फिरायला आवडतं. |
| खाणे | मला खायला आवडतं. |
| हसणे | मला हसायला आवडतं. |
| वाचणे | मला वाचायला आवडतं. |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>तुला काय करायला आवडतं ? (गाणी ऐकणे) | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>मला गाणी ऐकायला आवडतं. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| चित्र काढणे | मला चित्र काढायला आवडतं. |
| चित्र रंगवणे | मला चित्र रंगवायला आवडतं. |
| बागकाम करणे | मला बागकाम करायला आवडतं. |
| कविता करणे | मला कविता करायला आवडतं. |
| गप्पा मारणे | मला गप्पा मारायला आवडतं. |
| सायकल चालवणे | मला सायकल चालवायला आवडतं. |
| सिनेमा बघणे | मला सिनेमा बघायला आवडतं. |
| पत्र लिहिणे | मला पत्र लिहायला आवडतं. |
| ... | ... |

## ७ सामान्यातून असामान्य...

| | |
|---|---|
| तू चमचा कशासाठी वापरतोस ? | मी मोबाईल फोटो काढायला वापरतो. |
| तू इस्त्री कशासाठी वापरतेस ? | मी इस्त्री केस सरळ करायला वापरते. |
| तू कागद कशासाठी वापरतोस ? | मी चमचा स्क्रू घट्ट करायला वापरतो. |
| तू हेअरपिन कशासाठी वापरतेस ? | मी कागद होडी बनवायला वापरतो. |
| तू मोबाईल कशासाठी वापरतोस ? | मी हेअरपिन कुलुप उघडायला वापरते. |

## ८ आपण काय म्हणतो?

लग्न

वाढदिवस शुभेच्छा ! बढती

निकाल





### खालील संवाद वर्गात वाचू या.



**आशा** - साधना, अगं, तुझा वाढदिवस कधी असतो ?
**साधना** - जुलैमध्ये, १५ जुलैला. तुझा कधी असतो ?
**आशा** - एप्रिलमध्ये, ८ एप्रिलला.




### ९ खालील संवाद ऐकू या आणि कोण येतंय आणि कोण येत नाहीये याची नोंद घेऊ या.

१) **मधुरा** - हॅलो, मी मधुरा बोलतेय.
**पल्लवी** - हॅलो, कशी आहेस ?
**मधुरा** - मी मजेत आहे. अगं, या शनिवारी मी माझा वाढदिवस साजरा करतेय. नक्की ये हं.
**पल्लवी** - हो, नक्की येते. किती वाजता ?
**मधुरा** - सहा वाजता, घरी.
**पल्लवी** - हो, भेटूच.

२) **तुषार** - अरे, आज अभिजितचा वाढदिवस आहे. तू येतोयस ना माझ्याबरोबर ?
**सतीश** - नाही, यार. आज माझ्या आजीचापण वाढदिवस आहे. पार्ल्याला जातोय आज.
**तुषार** - ओह, मग मी एकटाच जातो... चल, बाय.


३) **देवांग** - हॅलो, वैभव, रविवार फ्री ठेव. मी वाढदिवसाची पार्टी देतोय.
**वैभव** - सही रे ! कुठे ?
**देवांग** - 'हॉटेल गोमंतक'मध्ये. धम्माल चिकन पार्टी. अमोल, अभिषेक आणि अक्षयपण आहेत.
**वैभव** - सही यार. मजा करू. मी येतोच.

४) **नेहा** - हॅलो, सोनिया, उद्या रसिकाचा वाढदिवस आहे.
**सोनिया**- हो अगं, पण मला नाही जमणार यायला.
**नेहा** - का गं ?
**सोनिया**- माझी परीक्षा आहे. ए, तू तिला माझ्याकडून भेटवस्तू दे हं. मी तुला पैसे देते.
**नेहा** - ओके, चालेल.

| नाव | कोण येतंय | कोण येत नाहीये |
|---|---|---|
| पल्लवी | | |
| तुषार | | |
| सतीश | | |
| वैभव | | |
| अमोल | | |

| नाव | कोण येतंय | कोण येत नाहीये |
|---|---|---|
| अभिषेक | | |
| अक्षय | | |
| सोनिया | | |
| नेहा | | |

## १० खालील तक्त्याच्या मदतीने संवाद साधू या.




| निमंत्रण | + | - | + - |
|---|---|---|---|
| मी ------------ | हो, नक्की | सॉरी, मला वेळ नाहीये. | मी नक्की सांगू शकत नाही. |
| वाढदिवस साजरा करतोय/करतेय. | हो, आम्ही येऊ सगळे. | मला बाहेर जायचंय. | मला यायला आवडेल, पण... |
| नक्की यायचं. | हो, मी येऊ शकते/शकतो. | | |
| -------- माझ्या वाढदिवसाची पार्टी आहे. | हो, आम्ही येऊ. | | मी तुला दोन दिवसांनी कळवतो/कळवते. |
| नक्की ये | | | |




## वाचू या.

**पल्लवी मधुराचं घर शोधत आहे.**


**पल्लवी** : अंबिका-सदन कुठे आहे ?
**व्यक्ती १** : लक्ष्मी-सदनच्या **मागे.**
**पल्लवी** : लक्ष्मी-सदन **लांब** आहे का ?
**व्यक्ती १** : नाही, **जवळच** आहे, या बिल्डिंगच्या पुढे.
(पल्लवी आता अंबिका-सदन **जवळ** येते.)
**पल्लवी** : काका, तांबे कुठे राहतात ?
**व्यक्ती २** : तांबे बी विंग **मध्ये** राहतात.
(पल्लवी आता बी विंग **जवळ** येते.)
**पल्लवी** : दादा, तांबे कुठे राहतात ?
**व्यक्ती ३** : तांबे **वर** दुसऱ्या मजल्यावर राहतात.



**११** ''--------- कुठे आहे?'' एक संवाद लिहू या.



पुढे | मागे | जवळ | लांब



मध्ये | समोर | वर | खाली

उदा॰ चेंडू कुठे आहे? - चेंडू मध्ये आहे.

**१२** जोड्या जुळवू या.

खाली बघ आणि चाल.

तुझं ऑफिस लांब आहे का?


पुढे वळण आहे, गाडी सावकाश चालवा.

राधा, इथे मध्ये उभी राहा.

जवळ एक शाळा आहे.

ए, वर बघ, विमान!

जरा मागे होता का?













**१३ मुंबईबद्दल लिहू या. (वर, खाली, उजवीकडे, डावीकडे)**

१


२


३


४


१. वर डावीकडे गेटवे ऑफ इंडिया आहे.

२. ------------------------------

३. ------------------------------

४. ------------------------------

## १४ चौकात काय दिसतंय ते सांगू या.

(इमारत, पुतळा, सायकलवाला, ट्रक, दुकानं, जाहिरात, जिलबीवाला, फळवाला, बस, मोटरसायकली)
(मागे, पुढे, जवळ, लांब, मध्ये)






१. मध्ये एक पुतळा आहे.
२. ------------------------------
३. ------------------------------
४. ------------------------------
५. ------------------------------
६. ------------------------------
७. ------------------------------
८. ------------------------------
९. ------------------------------
१०. ------------------------------

मी नेहमी ई-मेल वाचतो.

मी हल्ली डेस्कटॉप वापरत नाही. लॅपटॉप वापरते.

आता कॉम्प्युटरमुळे सगळं सोपं झालंय. झटपट कामं होतात.

मी कधी तरी फेसबुक बघते, पण ट्विटर नेहमी.

मी कधीच एक्सेलमध्ये काम करत नाही. कठीण वाटतं मला.

☐ नेहमी ☐ हल्ली ☐ आता ☐ कधीतरी ☐ कधीच नाही

मी नेहमी ऑनलाईन असते, पण हल्ली कामांसाठी. आता जॉब लागला ना!
कधीतरी चॅट करते, पण गेम खेळायला कधीच वेळ नसतो.

## १५ आता तुम्ही

| | | |
|---|---|---|
| आम्ही कधीच बोलत नाही | आता तुम्ही → | ---------------------------------------- |
| आम्ही कधीतरी बोलतो | | ---------------------------------------- |
| आम्ही आता बोलतो | | ---------------------------------------- |
| आम्ही हल्ली बोलतो | | ---------------------------------------- |
| आम्ही नेहमी बोलतो | | ---------------------------------------- |
| आम्ही कधी शांत असतो ? | | ---------------------------------------- |

## १६ तुम्ही कधी काय वाचता?

| | नेहमी | हल्ली | आता | कधी तरी | कधीच नाही |
|---|---|---|---|---|---|
| वर्तमानपत्र | | | | | |
| एस.एम.एस | | | | | |
| ई-मेल | | | | | |
| पत्र | | | | | |
| कविता | | | | | |
| लेख | | | | | |
| पुस्तक | | | | | |
| जाहिराती | | | | | |
| ... | | | | | |



## १७ वर्गात सांगू या: तुम्ही नेहमी काय करता? तुम्ही हल्ली काय करता? तुम्ही कधीच काय करत नाही?

## १८ तुला आता काय करायचंय?

मला आता अभ्यास करायचाय. उद्या परीक्षा आहे. सारख्या किती या परीक्षा.

सागरला आणि मला आता बाहेर जायचंय. पार्टीला. आज त्याचा वाढदिवस आहे.

काहीही नाही.

मला भूक लागलीय. मला जेवायचंय.

मला बँकेत जायचंय. पैसे भरायचेत.

भरपूर गृहपाठ आहे. खूप लिहायचंय मला.

उद्या आणि परवा मला एका कार्यशाळेत जायचंय. मला सादरीकरण करायचंय. तयारी करायचीय.

थोडक्यात

वाचणे → वाच + आयचे + आहे → वाचायचे आहे

**पण**

येणे → यायचे आहे
देणे → द्यायचे आहे
घेणे → घ्यायचे आहे
पिणे → प्यायचे आहे
लिहिणे → लिहायचे आहे

| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
|---|---|
| बसणे | बसायचे आहे |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| उठणे | उठायचे आहे |
| येणे | यायचे आहे |
| जाणे | जायचे आहे |
| घेणे | घ्यायचे आहे |
| लिहिणे | लिहायचे आहे |
| जेवणे | जेवायचे आहे |
| खाणे | खायचे आहे |
| चालणे | चालायचे आहे |
| पोहणे | पोहायचे आहे |
| ... | ... |

| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
|---|---|
| नृत्य | मला नृत्य शिकायचे/चं आहे. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| नृत्य | मला शिकायचे/चं आहे. |
| गायन/गाणे | मला गायन/गाणे शिकायचे/चं आहे. |
| पोहणे | मला पोहायला शिकायचे/चं आहे. |
| स्वयंपाक करणे | मला स्वयंपाक करायला शिकायचे/चं आहे. |
| गाडी चालवणे | मला गाडी चालवायला शिकायचे/चं आहे. |
| मराठी बोलणे | मला मराठी बोलायला शिकायचे/चं आहे. |
| ... | ... |

| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
|---|---|
| तुला आता काय करायचं आहे ? | मला अजून तयारी करायची आहे. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| बॅग भरणे | मला अजून बॅग भरायची आहे . |
| ई-मेल पाठवणे | मला अजून ई-मेल पाठवायचा आहे . |
| पैसे भरणे | मला अजून पैसे भरायचे आहेत . |
| गृहपाठ करणे | मला अजून गृहपाठ करायचा आहे. |
| वर्तमानपत्र वाचणे | मला अजून वर्तमानपत्र वाचायचं आहे. |
| ... | ... |

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका** |
| फुटबॉल | मला फुटबॉल शिकायचा आहे. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| फुटबॉल | मला फुटबॉल शिकायचा आहे. |
| कॉम्प्युटर | मला कॉम्प्युटर शिकायचा आहे. |
| पिआनो | मला पिआनो शिकायचा आहे. |
| अभिनय | मला अभिनय शिकायचा आहे. |
| ... | ... |



| | **लिहिताना** | **बोलताना** |
|---|---|---|
| तो पेपर | वाचायचा आहे. | वाचायचाय |
| ते पेपर | वाचायचे आहेत. | वाचायचेत |
| ती कादंबरी | वाचायची आहे. | वाचायचीय |
| त्या कादंबऱ्या | वाचायच्या आहेत. | वाचायच्यात |
| ते पुस्तक | वाचायचे आहे. | वाचायचंय |
| ती पुस्तके | वाचायची आहेत | वाचायचीयेत |

## १९ खालील ई-मेल वाचू या आणि योग्य उत्तरे लिहू या.

ताईस,

कशी आहेस? मी ठीक. अगं, इथे खूप कामं असतात. सगळं एकट्यावरच पडतं ना! आताच बघ, मला मोठं पत्र लिहायला वेळ नाही. मला बाजारात जायचं आहे (जाणे). भाज्या ---------------- ---------------- (घेणे). मग मित्राला ----------------- ---------- (भेटणे). घरी येऊन स्वयंपाक -------------------- -------------- (करणे). घर ------------------ --------------- (आवरणे). आणि ढीगभर पुस्तकं --------------------- --------------- (वाचणे). अमेरिका आणि इथला अभ्यास... उद्या फोन करतो.

तुझाच अभी.

## २० रिकाम्या जागा भरू या.

अ. ★ अरे, काय यार, मला आता क्लासला जायचंय (जाणे). कंटाळा आलाय खूप.

○ मग दांडी मार.

आ. ★ काय ------------------- (खाणे) ?

○ खायला नको काही. मला कॉफी --------------------- (पिणे)

इ. पैसे कुठे ------------------------- (भरणे) ?

ई. तुला ई-मेल ---------------------- (पाठवणे). तुझा ई-मेल आय.डी. काय आहे ?

उ. दर दिवशी नवीन काय ----------------------------- (करणे) खायला ?

| | |
|---|---|
| उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>तुला काय वाचायचंय ? | उदा॰ **शिक्षक/शिक्षिका**<br>मला वर्तमानपत्र वाचायचंय. |
| **शिक्षक/शिक्षिका** | **विद्यार्थी/विद्यार्थिनी** |
| ई-मेल | मला ई-मेल वाचायचाय. |
| पुस्तक | मला पुस्तक वाचायचंय. |
| कादंबरी | मला कादंबरी वाचायचीय. |
| लेख | मला लेख वाचायचाय. |
| कविता | मला कविता वाचायचीय. |
| ग्रंथ | मला ग्रंथ वाचायचाय. |
| जाहिरात | मला जाहिरात वाचायचीय. |
| एस.एम.एस | मला एस.एम.एस वाचायचाय. |
| ... | ... |

## २१ योग्य रूप निवडू या आणि वाक्ये पुन्हा लिहू या.

अ. चला, उठा, अभ्यास करायचीय / करायचाय / करायचंय.

---------------------------------------------------------------------------------

आ. मला हे काम आजच संपवायचाय / संपवायचंय / संपवायचीय.

---------------------------------------------------------------------------------

इ. उद्या ही पत्रं पाठवायचीयत / पाठवायचेयत / पाठवायच्यात.

---------------------------------------------------------------------------------

सराव

ई. कुठला खेळ खेळायचंय / खेळायचाय / खेळायचीय ?

-----------------------------------------------------------------------

उ. तुला कुठलं पुस्तक वाचायचंय / वाचायचीय / वाचायचाय ?

-----------------------------------------------------------------------

ऊ. अरे आजच द्यायचंय / द्यायचाय / द्यायचीय ना तो चेक ? मी विसरलेच.


-----------------------------------------------------------------------



## करा आणि शिका

१. तुम्हाला तुमचा वाढदिवस साजरा करायचा आहे. त्यासाठी काय काय करायचंय त्याची यादी करा.
२. तुमचा वाढदिवस तुम्ही कसा साजरा करता ? पाच वाक्य लिहा.
३. तुमचा आवडता सण तुम्ही कसा साजरा करता ? पाच वाक्य लिहा.

## वाचू या ... चिंटू.




© चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर 2008

## म्हणी / वाक्प्रचार

करायला गेलो एक आणि झालं भलतंच.
देव लागला द्यायला, पदर नाही घ्यायला.



## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो हवालदार (ते) | ती फेरी (त्या फेऱ्या) | ते बागकाम (ती बागकामे) |
| तो ट्रक (ते) | ती इस्त्री (त्या इस्त्र्या) | |
| तो लेख (ते) | ती इमारत (त्या इमारती) | |
| तो पत्ता (ते पत्ते) | | |
| तो सण (ते सण) | | |
| तो वाढदिवस (ते -) | | |



| क्रियापद | विशेषण | शिष्टाचार शब्द | इतर शब्द | |
|---|---|---|---|---|
| गप्पा मारणे | फावला | यायचं हं | मागे | उजवीकडे |
| संपवणे | | नक्की या | पुढे | डावीकडे |
| साजरा करणे | | | लांब | नेहमी |
| | | | जवळ | हल्ली |
| | | | मध्ये | आता |
| | | | वर | कधी तरी |
| | | | खाली | कधीच नाही |

## आता मला हे येतं.

**आवडनिवड सांगणे आणि विचारणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**शुभेच्छा देणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**वाढदिवस सांगणे, विचारणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**वाढदिवसाचे आमंत्रण करणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**होकार वा नकार देणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी



## Photo Credits - Cover Page

| | |
|---|---|
| | Gabriele Siebert |
| Christopher | Tanya Mehta |
| John Kennedy | Sebastian Griese |
| Kimberly Rodricks | Aasim Khan |
| Mugdha Sharma | Shashank Mishra |
| | ... |

## Photo credits

| | |
|---|---|
| Nesen Ertugrul | Amol Kunjir |
| Ameya Poyrekar | Anuja Korde |
| Ashok Korde | Arvind Basutkar |
| Nidhi Patankar | Asha Kelkar |
| Narayan Kelkar | Bandhu Chavan |
| Arvind Nair | Bhakti Keni |
| Shripad Kale | Devang Tayde |
| Ketaki Siddhaarth | Gauri Kelkar |
| Vaishnavi Rane | Jara Schmidt |
| Prashant Samant | Kaivalya Nerurkar |
| Purvesh Unhalrkar | Manisha Kelkar |
| Padma Korde | Maria Imada |
| Saroj Mehta | Mugdha Deosthali |
| Prathamesh Kanawaje | Namrata Darekar |
| Aditi Ranade | Ninad Patil |
| Prachita Kanawaje | Omkar Dalavi |
| Saurabh Bhosale | Pallavi Korde |
| Sharad Korde | Pooja Samant |
| Trisha Fernandis | Prachi Kelkar |
| Rama Gadre | Prajakta Deshpande |
| Namrata Kelkar | Pranjali Kargutkar |
| Jayesh Mhatre | Rahul Korgaokar |
| Chintamani Jog | Rajas Deshpande |
| Nikita Deshpande | Raman Jeejha |
| Rashi Patankar | Ritika Gondhalekar |
| Eva Kaufmann | Saba Zafar |
| Sayli Patil | Samata Patil |
| Yash Desai | Sanjay Bhatia |
| Nandini Kelkar | Sarah Egger |
| Julia Twesten | Sarthak Korde |
| Bhakti Korde | Soham Thakur |
| Juilee Ghadge | Usha Kelkar |
| Urja Deshpande | Vedashree Patil |
| Ajay Chavan | ... |